प्रधान मंत्री आवास योजना-शहरी

*आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी PMAY(U) अंतर्गत ₹ २.५ लाख रूपयांचे अनुदान उपलब्ध
(*PMAY २.० प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही)

सिडको
शहरांचे शिल्पकार
CIDCO HOMES

नवे घर नवी ओळख

केवळ नवा पत्ता नव्हे, तर मिळेल एक नवी ओळख!



संग्रहीत व कलात्मक प्रतिमा

माझा 1स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये

माझे पसंतीचे सिडकोचे घर

माहिती पुस्तिका, ऑगस्ट २०२६

cidcohomes.com

तळोजा | खारघर | कळंबोली

सिडकोची महागृहनिर्माण योजना

शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या. महाराष्ट्र (सिडको) ही नवी मुंबईच्या नियोजित विकासासाठी स्थापन करण्यात आलेली विशेष नियोजन संस्था असून, सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात गुणवत्तापूर्ण सदनिका उपलब्ध करून देणे हे महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

गेल्या काही वर्षांत सिडकोने विविध गृहनिर्माण योजना यशस्वीपणे राबवून लाखो नागरिकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार केले आहे. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल सेवा व पारदर्शक कार्यपद्धतीचा अवलंब करून अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, सदनिका वाटप व ग्राहक सेवा या प्रक्रियांमध्ये सुलभता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता आणण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) [PMAY(U)] अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तींनुसार परवडणाऱ्या दरात सदनिका उपलब्ध करून देण्याचे कार्य सिडकोमार्फत करण्यात येत आहे.

सदर गृहनिर्माण प्रकल्पांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची **Transit Oriented Development (TOD)** या संकल्पनेनुसार करण्यात आलेली रचना. रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके तसेच प्रमुख दळणवळण मार्गांच्या निकटवर्ती परिसरात सदनिकांचे नियोजन करण्यात आले असून त्यामुळे नागरिकांना सुरक्षित, सुलभ व वेळेची बचत करणारी प्रवास व्यवस्था उपलब्ध होते.

सिडकोने विकसित केलेल्या सदनिकांमध्ये आधुनिक बांधकाम तंत्रज्ञान, उच्च दर्जाची बांधकाम गुणवत्ता, नियोजित नागरी सुविधा, हरित परिसर तसेच सक्षम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सदनिकांचे नियोजन, बांधकामाचा दर्जा व उपलब्ध सुविधा या आधुनिक नागरी जीवनमानाच्या गरजांचा विचार करून विकसित करण्यात आल्या आहेत.

नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उभारणीचा व्यापक अनुभव, तांत्रिक क्षमता व नियोजन कौशल्य या बळावर सिडको नागरिकांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.





उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचा शुभसंदेश

नवी मुंबईच्या सर्वांगीण आणि नियोजित विकासासोबतच समाजातील प्रत्येक घटकाला दर्जेदार आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देणे, ही सिडकोची सातत्यपूर्ण भूमिका राहिली आहे. 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' ही महागृहनिर्माण योजना या दिशेने टाकलेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

सिडकोने या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) **४,७७९** घरांची घोषणा **१५** ऑगस्ट **२०२६** रोजी केली आहे. प्रधानमंत्री आवास योजना – शहरी [PMAY (U)] अंतर्गत 'भागीदारीत परवडणारी घरे' (AHP) या घटकाअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या या प्रकल्पात नवी मुंबईतील खारघर, तळोजा आणि कळंबोली या महत्त्वाच्या नोड्समध्ये **१** BHK घरे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

घर हे प्रत्येक कुटुंबासाठी सुरक्षितता, स्थैर्य आणि सन्मानाचे प्रतीक असते. त्यामुळे EWS प्रवर्गातील पात्र कुटुंबांसाठी स्वतःच्या घराची उपलब्धता अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने ही घरे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत **₹२.५** लाखांपर्यंतच्या अनुदानाचा लाभ मिळू शकतो. यामुळे घरमालकीचे स्वप्न अधिक सुलभ होण्यास मदत होईल.

नवी मुंबई आज विकास आणि नव्या संधींच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, तसेच विविध दळणवळण आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे या प्रदेशाची कनेक्टिव्हिटी आणि आर्थिक क्षमता अधिक बळकट होत आहे. या विकासाचा लाभ समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे आणि नागरिकांचे जीवनमान उंचावणे, हे सिडकोच्या विकासदृष्टीचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

इच्छुक आणि पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा. योजनेची सविस्तर माहिती व अर्ज प्रक्रियेबाबतची माहिती www.cidcohomes.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

स्वतःच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. ही योजना त्यांच्या आयुष्यात नव्या घराची, नव्या सुरुवातीची आणि उज्ज्वल भविष्याची नांदी ठरो, हीच सदिच्छा.

श्री. अश्विन मुद्गल
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको



अनुक्रमणिका



अ.क्र.	विषय	पृष्ठ क्र.
१	‘माझे पसंतीचे सिडकोचे घर’ महागृहनिर्माण योजना - ऑगस्ट 2026: प्रकल्पाचा तपशील	४
२	महारेरा (MahaRERA) नोंदणी तपशील	५
३	नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या निकटवर्ती प्रकल्पांचे स्थान व उपलब्ध सुविधा	६
४	गृहनिर्माण योजनेतील प्रवर्ग	७
५	पात्रता निकष	८-९
६	सर्वसाधारण अटी व शर्ती	१०-१४
७	ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया (e-KYC)	१५-१७
८	बुकिंग प्रक्रिया	१८-१९
९	लॉटरी प्रक्रिया आणि क्रम	२०
१०	भरणा करण्याबाबत नियम व अटी	२१
११	परिशिष्ट – I	२२
१२	अर्ज/ शपथपत्रे / घोषणापत्रे	२३-३२

'माझे पसंतीचे सिडकोचे घर' - महागृहनिर्माण योजना : ऑगस्ट २०२६ प्रकल्प तपशील



अ. क्र.	स्थळ	प्रकार	रेरा चटईक्षेत्र (चौरस मीटर)	वापरयोग्य चटई क्षेत्र**	टॉवरची संख्या	युनिटची संख्या	किंमत (लाखांमध्ये*)
१	खारघर पूर्व (तळोजा), सेक्टर - ३९	१ BHK	२७.४७ ते २७.५६ पर्यंत	३२२	४१	४२२९	₹२३.५०
२	खारघर बस डेपो	१ BHK	२७.१० ते २७.१२ पर्यंत	३२२	१०	२९३	₹४३.५०
३	कळंबोली बस डेपो	१ BHK	२७.१० ते २७.१२ पर्यंत	३२२	८	२५७	₹३७.७०
एकूण						४७७९	

*अटी व शर्ती लागू. लागू होणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या (वेबसाईटच्या फुटरमधील 'EWS संकीर्ण शुल्क' हा दस्तऐवज पहा) सविस्तर माहितीसाठी कृपया माहिती पुस्तिकेचा संदर्भ घ्यावा.

**अस्वीकरण : वापरयोग्य चटई क्षेत्र (USABLE CARPET AREA) हे केवळ माहितीसाठी स्वतंत्रपणे नमूद करण्यात आले असून, त्याचा अर्थ रेरा चटई क्षेत्र असा लावण्यात येऊ नये. विक्री करार (AGREEMENT FOR SALE) केवळ रेरा चटई क्षेत्राच्या आधारे करण्यात येईल. अधिक माहितीसाठी सदनिकेचा आराखडा (FLAT LAYOUT PLAN) पहावा.

नोंद : वापरयोग्य चटई क्षेत्रामध्ये (जिथे लागू असेल तिथे) बाल्कनी व डक्ट क्षेत्राचा समावेश आहे. सर्व अधिकृत दस्तऐवजांमध्ये RERA नुसारचे कार्पेट क्षेत्रफळ सर्व कागदपत्रांमध्ये स्पष्टपणे नमूद केले जाईल. (उदा. : हेतुपत्र, वाटप पत्र आणि करारनामा)

ऑगस्ट २०२६ च्या सोडतीसाठी सदनिकांचा वर्गनिहाय (Category-wise) तपशील

स्थळ	युनिटची संख्या	दिव्यांग संख्या	सामान्य	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती	विमुक्त जाती	भटक्या जमाती	प्रकल्पग्रस्त	माथाडी	राज्य शासकीय कर्मचारी	माजी सैनिक	धार्मिक अल्पसंख्याक	पत्रकार
तळोजा, सेक्टर ३९	४२२९	३६८	१५७०	६३५	४४६	२२	१०८	३७२	२८३	६५	१११	१७६	७३
कळंबोली बस डेपो, तळोजा, सेक्टर १७	२५७	६४	९६	४९	३२	२	७	०	३	१	३	०	०
खारघर बस डेपो, तळोजा, सेक्टर १४	२९३	७२	११९	१८	७१	२	४	१	२	१	१	२	०
एकूण	**४७७९**	**५०४**	**१७८५**	**७०२**	**५४९**	**२६**	**११९**	**३७३**	**२८८**	**६७**	**११५**	**१७८**	**७३**

*वरील तक्त्यात नमूद प्रत्येक वर्गवारीतील सदनिकांची संख्या ही मागील गृहनिर्माण योजनेतील विक्री न झालेल्या उपलब्ध सदनिकांवर आधारित आहे. त्यामुळे आरक्षणानुसार लागू असलेल्या टक्केवारीचा व तक्त्यातील सदनिकांच्या संख्येचा थेट संबंध लावता येणार नाही. याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी. शासनाच्या धोरणानुसार आरक्षित प्रवर्गातील अर्जदारांना सदनिकांचे वाटप करण्यात येईल.

प्रकल्प तपशील -महारेरा

खारघर पूर्व
(तळोजा), सेक्टर-३९

P५२०००४५४४६

खारघर बस डेपो

P५२०००२८१९६

कळंबोली
बस डेपो

P५२०००२८१८३

प्रोजेक्टचे रेरा क्रमांक https://maharera.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर पाहायला मिळतील.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील प्रकल्पाची निकटता



प्रकल्प सुविधा

- उद्यान
- लहान मुलांचे क्रीडाक्षेत्र
- सामुदायिक केंद्र
- गेझिबो सिटिंग
- बहुउद्देशीय क्रीडांगण
- बैठकीची जागा
- शॉपिंग प्लाझा
- वॉकिंग ट्रॅक
- ॲम्फीथिएटर

*उपरोक्त नमूद सुविधा केवळ सूचक आहेत व त्या प्रकल्पानुसार बदलू शकतात.

सिडको महागृहनिर्माण योजना: आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्ग



सदर गृहनिर्माण योजना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) [PMAY(U)] अंतर्गत **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)** या प्रवर्गातील पात्र नागरिकांसाठी राबविण्यात येत आहे. या योजनेचा उद्देश पात्र नागरिकांना शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार परवडणाऱ्या दरात सदनिका उपलब्ध करून देणे हा आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)

सदर योजनेसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराने खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील:

- ज्या अर्जदाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न ₹६,००,०००/- (रुपये सहा लाख) पर्यंत आहे, तो अर्जदार या प्रवर्गासाठी पात्र राहील.
- अर्ज सादर करण्याच्या दिनांकास अर्जदाराचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक असावे.
- अर्जदार, त्याचा/तिचा पती अथवा पत्नी तसेच अविवाहित मुले यांच्या नावावर भारतात कोठेही पक्के घर नसावे. [भारतात पक्के घर नसलेल्या कमावत्या प्रौढ सदस्याला (वैवाहिक स्थिती विचारात न घेता) एक स्वतंत्र कुटुंब मानले जाऊ शकते.]
- अर्जदाराचे महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळ वास्तव्य असावे.

प्रधानमंत्री आवास योजना (PMAY-U) अंतर्गत आर्थिक सहाय्य

सदर योजनेतील पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून अनुदान मिळेल. यामध्ये -

- भारत सरकारकडून ₹१.५ लाख
- महाराष्ट्र शासनाकडून ₹१ लाख

असे एकूण ₹२.५ लाखांपर्यंतचे अनुदान अटी व शर्तींनुसार उपलब्ध राहील. जर अर्जदार किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याने [पत्नी, आई, अवलंबून असलेली व्यक्ती (Dependent) यांनी] यापूर्वी कोणत्याही शासकीय गृहनिर्माण योजनेअंतर्गत अनुदानाचा लाभ घेतलेला असेल, तर सदर योजनेअंतर्गत अर्जदार अनुदानासाठी पात्र राहणार नाहीत.

केंद्रशासनाच्या आदेशानुसार PMAY (U) ची मुदत ३०/०९/२०२६ पर्यंत (किंवा केंद्रशासनाने सदर मुदत वाढविली तर त्या वाढीव मुदतीपर्यंत) वाढविण्यात आली आहे. जर सदर मुदतीमध्ये PMAY च्या MIS Portal वर अर्जदाराची संपूर्ण माहिती Upload होऊन त्यांचे व सह-अर्जदाराचे नाव संलग्नित (Attach) झाले तरच त्यांना २.५ लाख रुपयांचा लाभ मिळेल.

लाभार्थी कुटुंबाची व्याख्या

- PMAY - मार्गदर्शिकेनुसार लाभार्थी कुटुंबामध्ये पती, पत्नी तसेच अविवाहित मुलगा व/किंवा अविवाहित मुलगी यांचा समावेश राहील. अर्जदाराच्या नावाने किंवा कुटुंबातील इतर कोणत्याही सदस्याच्या नावाने लाभार्थी कुटुंबाचे भारतामध्ये कोठेही पक्के घर (सर्व हंगामांसाठी राहण्यायोग्य निवासस्थान) नसावे.
- वैवाहिक स्थिती विचारात न घेता कमावणाऱ्या प्रौढ व्यक्तीस स्वतंत्र कुटुंब म्हणून विचारात घेतले जाऊ शकते, मात्र त्याच्या/तिच्या नावावर भारतात कोठेही पक्के घर (सर्व हंगामांसाठी राहण्यायोग्य निवासस्थान) नसावे.
- पती किंवा पत्नी यांपैकी कोणत्याही एकाच्या नावाने अथवा संयुक्त नावाने अर्ज करता येईल. तथापि, लाभार्थी कुटुंबास या योजनेअंतर्गत केवळ एकाच सदनिकेसाठी पात्रता राहील.

पात्रता निकष

१. उत्पन्नाच्या निकषांवर आधारित:

- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS) अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ₹ ६,००,०००/- पर्यंत असणे अनिवार्य राहील.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्न म्हणजे अर्जदार आणि त्याच्या/तिच्या जोडीदाराचे मागील सलग १२ महिन्यांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न गृहीत धरले जाईल.

१) कुटुंबातील सर्व सदस्यांचे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चे आयकर विवरणपत्र.

२) तहसीलदार यांनी जारी केलेले आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चे उत्पन्न प्रमाणपत्र.

३) नियोक्त्याने (Employer) दिलेले आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चे उत्पन्न प्रमाणपत्र (लेटरहेड, सही व शिक्क्यासह).

४) अर्जदार अथवा सह-अर्जदार उत्पन्न मिळवत नसल्यास विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र. (फॉर्म G पहा)

२. पक्क्या घराच्या मालकीवर आधारित:

अर्जदार किंवा त्याच्या कुटुंबातील कुठल्याही सदस्याच्या नावावर भारतात पक्के घर नसावे.



३. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate):

- अर्जदाराने सक्षम प्राधिकाऱ्यांनी जारी केलेले वैध अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- बारकोडविरहित जुन्या स्वरूपातील अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. अशा प्रमाणपत्राचे अद्ययावतीकरण करून बारकोडयुक्त प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- सदर अट माजी सैनिकांसाठी लागू राहणार नाही.



४. आरक्षण:

सदर योजनेमध्ये शासनाच्या लागू धोरणानुसार वैधानिक व इतर आरक्षण प्रवर्ग लागू राहतील.

वैधानिक प्रवर्ग :

अनुसूचित जाती — ११.०%	अनुसूचित जमाती — ६.०%
भटक्या जमाती — १.५%	विमुक्त जाती — १.५%

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील अर्जदारांनी जात प्रमाणपत्रासह जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

दिव्यांग (शारीरिकदृष्ट्या अपंग) — ५%

युनिक डिसॅबिलिटी आयडी (UDID) कार्ड आवश्यक.

आरक्षित प्रवर्ग:

राज्य शासकीय कर्मचारी	१%
माथाडी कामगार	५%
प्रकल्पग्रस्त	५%
माजी सैनिक	१.५%
पत्रकार	१%
धार्मिक अल्पसंख्याक	२.५%

नोंद: सर्व संबंधित प्रमाणपत्रे/कागदपत्रे सदर माहितीपुस्तिकेच्या परिशिष्ट-I मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील.

सर्वसाधारण अटी व शर्ती

PMAY (U) अंतर्गत मार्गदर्शिक तत्त्वानुसार कुटुंबातील महिला सदस्यास अर्जदार किंवा सह-अर्जदार असण्यास प्राधान्य देण्यात यावे. त्यानुसार सदर गृहनिर्माण योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांनी पुढील अटी व शर्तींचे पालन करणे आवश्यक राहील.

१. सह-अर्जदार

अ) विवाहित अर्जदाराच्या बाबतीत पती अथवा पत्नी यांचा सह-अर्जदार म्हणून समावेश करणे बंधनकारक राहील.

ब) अविवाहित पुरुष अर्जदाराच्या बाबतीत आईचा सह-अर्जदार म्हणून समावेश करता येईल.

क) महिला अर्जदाराच्या बाबतीत सह-अर्जदाराचा समावेश ऐच्छिक राहील.

ड) अविवाहित अर्जदाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

२. प्रधानमंत्री आवास योजना (PMAY-U)

अ) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत आर्थिक सहाय्याचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक राहील.

ब) प्रधानमंत्री आवास योजना (PMAY-U 2.0) अंतर्गत जारी करण्यात आलेले प्रमाणपत्र सदर योजनेसाठी ग्राह्य धरले जाणार नाही.

३. कुटुंबात महिला सदस्य उपलब्ध नसल्यास

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील कुटुंबामध्ये कोणतीही प्रौढ महिला सदस्य उपलब्ध नसल्यास, अर्ज कुटुंबातील पात्र पुरुष सदस्याच्या नावाने अर्ज सादर करता येईल.

४. हस्तांतरणावरील निर्बंध

विक्री करार (Agreement for Sale) नोंदणीच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीत सदनिकेचे विक्रीद्वारे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही.

वैधानिक आरक्षण प्रवर्गातील सदनिकांच्या बाबतीत पाच वर्षांनंतरही हस्तांतरण संबंधित आरक्षण प्रवर्गातील पात्र व्यक्तीलाच, महामंडळाच्या पूर्वलिखित परवानगीने व त्या वेळी लागू असलेले शुल्क भरल्यानंतरच करता येईल.

५. अर्ज रद्द करण्याबाबत

खोटी माहिती, चुकीची माहिती किंवा तथ्य लपवून अर्ज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचा महामंडळास अधिकार राहील.

कुटुंबातील कुठल्याही सदस्याच्या नावे प्रधानमंत्री आवास योजनेचा PMAY (U) लाभ यापूर्वी घेतल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्ज अपात्र ठरेल. तसेच, महामंडळाच्या नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.



६. संयुक्त मालकी:

विक्री करारनामा (Agreement) करण्यापूर्वी अर्जदाराच्या विनंतीनुसार सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून पती/पत्नी अथवा आई यांचा सह-अर्जदार म्हणून समावेश करण्याचे अधिकार महामंडळास आहे. याकरिता प्रशासकीय शुल्क **₹५०००/-** + जीएसटी एवढा भरणा करावा लागेल.



इतर अटी:

I. सदनिकांचे वाटप नवी मुंबई जमीन वितरण (सुधारित) नियमावली, २००८ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

II. महामंडळाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणानुसार सदनिकेच्या विक्री किंमतीमध्ये आवश्यक ते बदल करण्यात येऊ शकतात. तसेच संबंधित आर्थिक वर्षातील लागू असलेले दर वाटपधारकांसाठी लागू करण्यात येतील.

III. सर्व सदनिकांचे वाटप "आहे त्या स्थितीत" (As is where is basis) या तत्त्वावर करण्यात येईल.

IV. लॉटरीमध्ये निश्चित झालेली सदनिका सदनिकेतील बदल करण्याबाबत केलेली मागणी कुठल्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाही.



V. एका लाभार्थी कुटुंबास या योजनेअंतर्गत केवळ एकाच सदनिकेचा लाभ घेता येईल. वाटपधारक अथवा त्याच्या/तिच्या कुटुंबातील सदस्यांनी एकापेक्षा अधिक वेळा सदनिका वाटपाचा लाभ घेतल्याचे आढळून आल्यास, अशी सर्व वाटपे रद्दबातल ठरण्यास पात्र राहतील.

VI. सदनिकांचे वापरयोग्य चटई क्षेत्र (Usable Carpet Area), रेरा चटई क्षेत्र (RERA Carpet Area), विक्री किंमत तसेच उपलब्ध सदनिकांची संख्या ही प्राथमिक स्वरूपाची असून अंतिम मंजुरी, तांत्रिक पडताळणी व लागू नियमांच्या अधीन राहून त्यामध्ये बदल होऊ शकतात.

VII. जाणीवपूर्वक चुकीची माहिती सादर केल्यास अर्जदाराचा अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

VIII. आरक्षित प्रवर्ग म्हणजेच अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती (DT) व भटक्या जमाती (NT) मधील यशस्वी अर्जदारांनी पात्रतेच्या निश्चितीसाठी जात वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच अर्जदाराकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसे न झाल्यास सदनिकेचे वाटप रद्द करण्यात येईल.

IX. इतर आरक्षण प्रवर्गातील अर्जदारांनी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी जारी केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

X. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) अर्जदारांसाठी/लाभार्थ्यांसाठी मजल्यानुसार वाढीव शुल्क (Floor Rise Charges) लागू असणार नाही.

XI. करारनामा आणि ताबा

- वैध अधिवास प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सदनिकेचा ताबा देण्यात येईल. भोगवटा प्रमाणपत्र सादर करण्यात झालेल्या विलंबामुळे ताबा देण्यास उशीर झाल्यास त्याबाबत महामंडळ कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा नुकसानभरपाई देण्यास जबाबदार राहणार नाही.
- नवी मुंबई जमीन विल्हेवाट (सुधारित) नियम, २००८ [NMDL(A)R, 2008] मधील नियम १४.२(ii) व १४.२(iii) मधील तरतुदींनुसार, सदनिकेची संपूर्ण विक्री किंमत तसेच इतर सर्व लागू शुल्क व रकमेचा पूर्ण भरणा केल्यानंतर, महामंडळाने निर्गमित केलेल्या सूचना अथवा पत्राची पोच प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अर्जदाराने विक्री करार (Agreement for Sale) निष्पादित करून संबंधित सदनिकेचा ताबा घेणे बंधनकारक राहील. विहित कालावधीत विक्री करार निष्पादित न झाल्यास, करार निष्पादित होईपर्यंतच्या कालावधीसाठी ₹५/- प्रति चौरस मीटर प्रति महिना या दराने पाहणी व सुरक्षा शुल्क (Watch and Ward Charges) तसेच लागू देखभाल शुल्क (Maintenance Charges) आकारण्यात येईल.

XII. सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना व सदनिकाधारकांच्या जबाबदाऱ्या

अ) सहकारी गृहनिर्माण संस्थेची स्थापना

विक्री करार (Agreement for Sale) पूर्ण झाल्यानंतर आणि सदनिकेचा ताबा घेतल्यानंतर, सदनिका मालक संबंधित सोसायटीचे भागधारक होतील. ज्या सदनिका विकल्या गेलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी सिडको लिमिटेड ही सहकारी गृहनिर्माण संस्था भागधारक (Share Holder) राहील. तथापि, भविष्यात अशा शिल्लक सदनिका ज्या व्यक्तींना विक्री करण्यात येतील, त्यांना सिडको लिमिटेड ऐवजी कंपनी/सोसायटीकडून भागधारक/सदस्य म्हणून स्वीकारण्यात येईल.

जर सदनिका मालकांची नवीन सोसायटी स्थापन व नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर प्रत्येक भागधारक/सदस्य हा नवी मुंबई जमीन वितरण (सुधारित) नियमावली, **२००८** तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, **१९६०** यांच्या तरतुदींना बांधील राहील तसेच सिडकोच्या पूर्वलिखित परवानगीशिवाय, ठराविक कालावधीपूर्वी कोणताही भागधारक/सदस्य सोसायटीतील आपला हिस्सा हस्तांतरित करू शकणार नाही किंवा वाटप केलेल्या सदनिकेसंदर्भात कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क निर्माण करू शकणार नाही, तसेच सोसायटी देखील अशा हस्तांतरणासाठी आपल्या भागधारक/सदस्यास परवानगी देणार नाही.

ब) भाडेपट्टा शुल्क व कर

संबंधित सोसायटीने, प्रसंगानुसार, वेळोवेळी निश्चित करण्यात येणाऱ्या दरानुसार सिडकोकडे भाडेपट्टा शुल्क (Lease Rent) नियमितपणे भरावा. तसेच, कंपनी किंवा सोसायटी/तिचे सदस्य, प्रसंगानुसार, नवी मुंबई महानगरपालिका/पनवेल महानगर-पालिका किंवा शासनाकडे मालमत्ता कर, उपकर (GST सहित) तसेच भाडेपट्ट्याने कंपनी/सोसायटीला दिलेल्या जमीन/इमारतीवर किंवा सदनिका मालकांना विक्री केलेल्या सदनिकांवर वेळोवेळी आकारण्यात येणारा किंवा भविष्यात आकारण्यात येऊ शकणारा जमीन महसूल थेट भरतील. कंपनी/सोसायटी तसेच सदनिका मालक या दोघांनाही सर्व स्थानिक/शासकीय प्राधिकरणांचे तसेच सिडको लिमिटेडचे सर्व नियम व अटी पाळण्यास बांधील राहतील.

क) इमारतीची देखभाल

सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वतःच्या खर्चाने इमारतीची नियमित देखभाल करावी. इमारतीच्या संरचनात्मक सुरक्षिततेस बाधा पोहोचेल असे कोणतेही काम अथवा बदल करण्यात येऊ नयेत.

ड) सदनिकेतील संरचनात्मक बदल व सदनिकेचा वापर

महामंडळाची पूर्वलिखित परवानगी घेतल्याशिवाय कोणताही संरचनात्मक बदल, अतिरिक्त बांधकाम, विस्तार अथवा वास्तुरचनेत बदल करता येणार नाही. सदनिकेचा वापर केवळ निवासी प्रयोजनासाठी करण्यात यावा. अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करण्यास परवानगी राहणार नाही.



XIII. संगणकीय सोडत पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही सदनिकेबाबत न्यायालयीन वाद, मालकी हक्कासंबंधी वाद अथवा अन्य कायदेशीर अडचण निदर्शनास आल्यास, महामंडळ आवश्यक पडताळणी करून योग्य तो निर्णय घेईल. संबंधित निर्णय अर्जदारास बंधनकारक राहील.

XIV. विक्री न झालेल्या सदनिका तसेच व्यावसायिक गाळे यांच्या संदर्भात प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेस महामंडळाकडून कोणतेही देखभाल शुल्क अदा करण्यात येणार नाही. विक्री न झालेल्या उर्वरित सदनिका तसेच व्यावसायिक गाळे यांची विक्री, वाटप अथवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचा अधिकार महामंडळाकडे आहे.



XV. सदर योजनेअंतर्गत सदनिका तसेच व्यावसायिक घटकांच्या विल्हेवाटीसंबंधी लागू असलेल्या सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अर्थ लावण्या बाबत अथवा त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबीवर महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक यांचा निर्णय अंतिम राहील आणि तो सर्व संबंधित पक्षांवर बंधनकारक राहील.

XVI. कायदेशीर वारसास हक्क व लाभांचे हस्तांतरण

अ) वाटपधारकाचा मृत्यू झाल्यास

वाटपधारकाचा मृत्यू झाल्यास, संबंधित सदनिकेच्या वाटपास लागू असलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे, सदनिकेची विक्री किंमत, इतर लागू शुल्क व रकमेचा भरणा करणे तसेच महामंडळास आवश्यक ती माहिती व कागदपत्रे सादर करणे ही मृत वाटपधारकाच्या कायदेशीर वारसांची जबाबदारी राहील.

मृत वाटपधारकास वाटप करण्यात आलेल्या सदनिकेच्या संदर्भात, सक्षम न्यायालयाने निर्गमित केलेले वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) अथवा उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) महामंडळास तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.

वाटपधारकाने (Allottee) मृत्युपत्र (Will) केले असल्यास आणि जर ती सदनिका लाभार्थींच्या नावे असल्यास, अशा मृत्युपत्राच्या निष्पादकाने/लाभार्थ्याने वाटपासाठी अर्ज करावा आणि सदर प्रक्रियेमध्ये कोणतेही वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) अथवा उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) सादर करणे आवश्यक राहणार नाही.

ब) कायदेशीर वारसास हस्तांतरण

सक्षम न्यायालयाने निर्गमित केलेल्या वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate), उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) किंवा मृत्युपत्र (Will) यांच्या आधारे मृत वाटपधारकास वाटप करण्यात आलेली सदनिका संबंधित कायदेशीर वारसाच्या/वारसांच्या नावे हस्तांतरित करण्यात येईल.

मृत वाटपधारकाच्या कायदेशीर वारसाच्या/वारसांच्या नावे सदनिकेचे हस्तांतरण करताना हस्तांतरण शुल्क (Transfer Charges) आकारण्यात येणार नाही.

तथापि, मृत वाटपधारकाने कोणत्याही वित्तीय संस्था अथवा बँकेकडून सदनिकेसाठी कर्ज घेतले असल्यास, संबंधित वित्तीय संस्था अथवा बँकेचे ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate – NOC) हस्तांतरणापूर्वी सादर करणे आवश्यक राहील. याशिवाय, सदनिकेच्या हस्तांतरणासाठी महामंडळाने वेळोवेळी निश्चित केलेले प्रशासकीय शुल्क कायदेशीर वारसाने अदा करणे आवश्यक राहील.

ऑनलाईन अर्ज नोंदणी (e-KYC) प्रक्रिया:

नोंदणीच्या वेळी अर्जदाराने खालील माहिती तयार ठेवावी:

- आधार क्रमांक आणि आधार कार्डची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार २MB)
- पॅन कार्ड आणि त्याची स्वसाक्षांकित प्रत/प्रतिमा (jpg/ png/ pdf स्वरूपात - कमाल आकार २MB)
- बँक खाते तपशील आणि रद्द केलेला धनादेश
- मोबाईल क्रमांक (आधार कार्डशी लिंक असणारा)
- ई-मेल आयडी (सक्रिय)
- सह-अर्जदाराचे तपशील
- परिशिष्ट I मध्ये नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे
- अलीकडील छायाचित्र
- आधार कार्ड आणि पॅन कार्ड मधील तपशील समान असणे अनिवार्य आहे.



सदर गृहनिर्माण योजनेसाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असून, अर्जदाराने खालील टप्प्यांनुसार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक राहील.

टप्पा १ : वापरकर्ता नोंदणी (Sign Up)

अर्जदाराने www.cidcohomes.com या संकेतस्थळास भेट देऊन नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करावी.

नोंदणीसाठी पुढील माहिती नमूद करावी –

- अर्जदाराचे पूर्ण नाव
- मोबाईल क्रमांक

नोंदणीदरम्यान नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर एक लॉगिन OTP पाठवला जाईल. अर्जदाराने OTP प्रविष्ट करावा आणि खाते तयार करावे.

टप्पा २ : ई-केवायसीची पडताळणी

- खाते तयार झाल्यानंतर, ग्राहकाने त्यांचा आधार नंबर प्रविष्ट करावा. आधारशी जोडलेल्या मोबाइल क्रमांकावर एक OTP प्राप्त होईल. ग्राहकाने त्यांच्या आधार पडताळणीसाठी तो OTP प्रविष्ट करावा.
- आधार प्रमाणित झाल्यानंतर, ग्राहकाने आपला पॅन क्रमांक प्रविष्ट करावा. पॅनची पडताळणी डिजिटल पद्धतीने होईल.

टप्पा ३ : बँक खात्याचा तपशील

अर्जदाराचे बँक तपशील नोंदवा

१) दिलेल्या तक्त्यानुसार बँक तपशील भरा.

२) रद्द केलेला धनादेश (Cancelled Cheque) किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत अपलोड करा.

३) जाहीरनामा सादर करा.

कुठल्याही कारणास्तव परतावा देय असल्यास आपण सादर केलेल्या बँक खात्यातच रक्कम जमा करण्यात येईल.

टप्पा ४ : अर्जदाराचा तपशील

• अर्जदाराचे मासिक कौटुंबिक उत्पन्न आणि मालकीच्या घराचे तपशील.

• वैयक्तिक तपशील, जसे की व्हॉट्सॲप क्रमांक (हे ऐच्छिक आहे, परंतु सर्वप्रकारचे महत्त्वाचे अपडेट्स मिळवण्यासाठी तो प्रविष्ट करण्याचा सल्ला दिला जातो), वैवाहिक स्थिती (Marital Status), संपर्क पत्ता (अर्जदाराचा वर्तमानातील सक्रीय पत्ता) आणि सक्रिय ई-मेल आयडी. ई-मेल आयडीवर एक OTP पाठविला जाईल, अर्जदाराने ई-मेल आयडीवर प्राप्त झालेला OTP प्रविष्ट करावा आणि त्याची पडताळणी करावी. आगामी काळात योजनेशी संबंधित विविध संवाद आणि अपडेट्स मिळवण्यासाठी हे आवश्यक आहे.

- सह-अर्जदाराचे तपशील जोडा आणि त्यांच्याद्वारे स्व-साक्षांकित केलेले त्यांचे आधार आणि पॅन कार्ड अपलोड करा.
- योग्य श्रेणी निवडा

प्रवर्गाची निवड

अर्जदाराने स्वतःस लागू असलेला प्रवर्ग निवडून त्यासंबंधित आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

अ . वैधानिक प्रवर्ग

महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जात व जात वैधता प्रमाणपत्र स्वसाक्षांकित स्वरूपात सादर करणे अनिवार्य आहे. इतर राज्यांतून जारी केलेली जात प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

- अनुसूचित जाती
- अनुसूचित जमाती
- विमुक्त जाती
- भटक्या जमाती

अर्जदाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल, तर त्याने/तिने सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक प्रमाणपत्र मिळवून करारावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ते सादर करणे आवश्यक आहे. हा दस्तऐवज अनिवार्य आहे. जर महाराष्ट्र शासनानुसार अर्जदाराची जात वैध नसल्याचे आढळल्यास, वाटप रद्द केले जाईल आणि रक्कम सिडकोच्या धोरणानुसार परत केली जाईल.

ब. दिव्यांग (PH) प्रवर्ग

'दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, **२०१६'** नुसार सक्षम प्राधिकरणाने जारी केलेले प्रमाणपत्र आणि युनिक डिसॅबिलिटी आयडी (UDID) कार्ड ज्याद्वारे अर्जदाराचा शारीरिक दिव्यांग (PH) प्रवर्गातील दावा सिद्ध होतो. (दृष्टीहीनता, अल्पदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, श्रवणबाधित, हालचालीसंबंधी अपंगत्व, मतिमंदत्व, ऑटिझम, मानसिक आजार, विशिष्ट अध्ययन अडचण, बौद्धिक अपंगत्व – पात्रतेसाठी किमान **४०%** अपंगत्व आवश्यक आहे.)

क. आरक्षित प्रवर्ग (बिगर संवैधानिक प्रवर्ग)

सक्षम प्राधिकरणाकडून जारी केलेले वैध प्रमाणपत्र.

१. किमान ५ वर्षांची सेवा पूर्ण केलेले राज्य शासन कर्मचारी

(महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद कर्मचारी इ.) – संबंधित शासकीय विभागाच्या लेटरहेडवर अधिकृत अधिकाऱ्याच्या सही व शिक्क्यासह 'फॉर्म सी (Form C)' प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

२. पत्रकार

सिडकोच्या जनसंपर्क अधिकाऱ्याने जारी केलेले प्रमाणपत्र आणि 'फॉर्म डी (Form D)' - पत्रकारांसाठी घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.



३. धार्मिक अल्पसंख्याक
राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम, **१९९२** च्या कलम **२**(क) अंतर्गत अल्पसंख्याक म्हणून अधिसूचित केलेल्या सर्व समुदायांचा समावेश होतो. धर्माचा उल्लेख असलेले शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (School Leaving Certificate) सादर करणे आवश्यक असून, 'फॉर्म ई (Form E)' - धार्मिक अल्पसंख्याक असल्याबाबतचे नोटराइज्ड प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

४. फक्त महाराष्ट्रातील प्रकल्पग्रस्त व्यक्ती.
प्रकल्पग्रस्त कुटुंबाच्या वंशावळीचे प्रतिज्ञापत्र, निवाडा प्रत (Award Copy), **७/१२** उतारा अथवा संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून/विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (परिशिष्ट। पहा)

५. माजी (निवृत्त) सैनिक
यामध्ये निमलष्करी दलांचा समावेश आहे (सेना, नौदल, वायुसेना, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, एनएसजी, आसाम रायफल्स, सीआरपीएफ, एसएसबी आणि नौदल तटरक्षक दल) आणि त्यांचे अवलंबित असलेले कुटुंबीय - निवृत्त सैनिकांवर अवलंबून असलेल्यांमध्ये यांचा समावेश असेल: जोडीदार (पत्नी/पती), मुलगे, अविवाहित मुली आणि निवृत्त सैनिकावर अवलंबून असलेले पालक. (परिशिष्ट। पहा)

६. माथाडी कामगार
फक्त मुंबई महानगर विभागातील (MMR) माथाडी कामगार पात्र राहतील. (परिशिष्ट। पहा)

टप्पा ५: कागदपत्रे अपलोड करणे:

- सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वप्रमाणित (Self-Attested) स्कॅन केलेल्या प्रती (jpg/png/pdf स्वरूपात) असणे आवश्यक आहे – प्रत्येक फाईलचा आकार **२**MB पेक्षा जास्त नसावा.
- अधिवास प्रमाणपत्रासाठी बारकोड असलेले दस्तऐवज अनिवार्य आहे.
- अर्ज केलेल्या प्रवर्गानुसार आवश्यक असलेली सर्व हमीपत्रे/ प्रतिज्ञापत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे/ जिथे लागू असेल तिथे ओटीपी (OTP) चा वापर करून डिजिटल पद्धतीने प्रमाणित करावे.
- जातीचे वैधता प्रमाणपत्र करारनामा स्वाक्षरी करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

टीप: करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास, वाटप केलेली सदनिका रद्द करण्यात येईल तसेच सिडकोच्या धोरणानुसार कपात करून उर्वरित रक्कम परत करण्यात येईल.

टप्पा 6: अर्ज शुल्क :

- सदर योजनेसाठी अर्ज करताना पुढील शुल्क भरावे लागेल–
  अर्ज नोंदणी शुल्क – **₹२००/-** + जीएसटी (GST)
- पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन भरणा करणे आवश्यक आहे.
- भरणा करण्यापूर्वी अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती काळजीपूर्वक पडताळून घ्यावी. एकदा भरणा पूर्ण झाल्यानंतर अर्जामध्ये भरलेली माहिती किंवा निवडलेला प्रवर्ग बदलता येणार नाही. अर्जदारास 'माझे खाते (My Account)' या विभागातून नियमानुसार सादर केलेला अर्ज व पेमेंट पावती डाऊनलोड करता येईल.



बुकिंग प्रक्रिया

संपूर्ण अर्ज/नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन आहे आणि वाटप प्रक्रिया ऑनलाइन प्रणालीद्वारे केली जाईल.





ऑनलाइन नोंदणी पूर्ण केलेल्या अर्जदारांना त्यांचे पसंतीक्रम (Preferences) नोंदविण्याबाबत सूचित केले जाईल. अर्जदार एकूण **१५** पसंतीक्रम निवडू शकतात. त्याबाबतचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे:

१. सदनिका वाटपाची सोडत एकूण चार टप्प्यांत (Rounds) आयोजित केली जाईल. सर्व अर्जदारांनी प्रथम तीन टप्प्यांतील सोडतीमध्ये सहभागी होणे अनिवार्य आहे.

२. प्रथम तीन टप्प्यांपैकी प्रत्येक टप्प्यात अर्जदाराला किमान 1 आणि कमाल **५** पसंतीक्रम (Prefe ences) सादर करता येतील.

३. 'पसंतीक्रम' म्हणजे अर्जदाराने निवडलेले गृहप्रकल्पाचे ठिकाण (Location), इमारत (Tower) आणि मजला (Floor) यांचा एकत्रित पर्याय होय.

४. अर्जदाराने निवडलेल्या एकाच ठिकाणासाठी (Location) प्रत्येक टप्प्यात इमारत व मजल्याचे कमाल 3 पसंतीक्रम देता येतील. कोणत्याही टप्प्यात ठिकाणांची संख्या निवडण्यावर कोणतेही बंधन असणार नाही; मात्र, एकूण पसंतीक्रमांची कमाल मर्यादा प्रति टप्पा 5 इतकीच राहील.

५. जर अर्जदार सोडतीच्या पहिल्या टप्प्यात (1st Round) यशस्वी ठरला/निवडला गेला, तर त्याच्या अर्जाचा पुढील टप्प्यांतील सोडतीसाठी विचार केला जाणार नाही.


६. जर अर्जदार एखाद्या विशिष्ट टप्प्यात अयशस्वी ठरला, तर संगणकीय प्रणालीद्वारे अर्जदाराने संबंधित टप्प्यासाठी दिलेल्या पसंतीक्रमांच्या आधारे पुढील टप्प्यातील सोडतीसाठी स्वयंचलितरीत्या (Automatically) त्याचा विचार केला जाईल.

७. जर अर्जदार प्रथम तीनही टप्प्यांत अयशस्वी राहिला, तर त्याने/तीने नोंदविलेली संमती / पर्याय (Consent/Option) विचारात घेऊन चौथ्या टप्प्यातील सोडतीसाठी त्याचा/तिचा विचार केला जाईल.

८. अर्जदार खालीलपैकी एका पर्यायाला संमती (Consent) देऊन चौथ्या टप्प्यात 'कोणतीही सदनिका वाटप करा' (Allot Any) अंतर्गत सहभागी होऊ शकतात:

- "माझ्या पसंतीच्या ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा" किंवा
- "या योजनेतील कोणत्याही ठिकाणी कोणतीही सदनिका वाटप करा" किंवा
- "कोणतेही वाटप करा यासाठी इच्छुक नाही."
- पसंतीक्रम नोंदविल्यानंतर अर्जदारास **₹७५,०००/-** इतकी बुकिंग रक्कम भरावी लागेल.
- बुकिंग रक्कम भरण्याची मुदत संपल्यानंतर, लॉटरीसाठी पात्र ठरलेल्या अर्जदारांची तात्पुरती यादी (Draft List) प्रसिद्ध करण्यात येईल. ज्या अर्जदारांची नावे या तात्पुरत्या यादीत समाविष्ट नाहीत किंवा ज्यांच्या माहितीत तफावत/त्रुटी आढळून आल्यास, असे अर्जदार यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **७** दिवसांच्या आत हरकत नोंदवू शकतात.
- आक्षेप नोंदविण्याच्या अंतिम दिनांकापासून **७** दिवसांच्या आत प्राप्त आक्षेपांचे निराकरण करण्यात येईल.
- संगणकीय सोडतीपूर्वी पात्र अर्जदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
  संगणकीय सोडतीची तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, यशस्वी अर्जदारांची यादी सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल, तसेच यशस्वी अर्जदारांना इरादा पत्र (Letter of Intent - LOI) निर्गमित करण्यात येईल.
  सोडत प्रक्रियेत अयशस्वी ठरलेल्या अर्जदारांना त्यांनी भरलेली बुकिंग रक्कम परत केली जाईल.
- कागदपत्रांच्या पडताळणीनंतर, सर्व पात्र अर्जदारांना निश्चिती रक्कम (Confirmation Amount) भरण्यासाठी निश्चिती पत्र (Confirmation Letter) निर्गमित करण्यात येईल. जर अर्जदाराने सदनिका रद्द केली अथवा निश्चिती रक्कम विहित मुदतीत भरली नाही, तर दिलेले इरादा पत्र (LOI) रद्द केले जाईल आणि प्रशासकीय शुल्क म्हणून **₹५,०००/-** + जीएसटी (GST) वजा करून उर्वरित बुकिंग रक्कम परत केली जाईल.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील सोडतीत यशस्वी ठरलेल्या अर्जदारांनी **₹७५,०००/-** निश्चिती रक्कम भरणे बंधनकारक/अनिवार्य राहील.
- निश्चिती रक्कम प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास वाटप पत्र (Allotment Letter) निर्गमित करण्यात येईल.
- विजेत्या अर्जदारांनी वाटप पत्रामध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार उर्वरित रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहील.
- सर्व हप्त्यांची रक्कम यशस्वीरीत्या जमा झाल्यानंतर विक्री करारनामा (Agreement to Sale) करण्यात येईल. करारनाम्याची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच घराचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येईल आणि ताबा देण्याच्या दिवशी सदनिकेच्या चाव्या लाभार्थ्यांकडे सुपूर्द करण्यात येतील.

- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गाबाबत विशेष अट:**
  आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील अर्जदारांसाठी, करारनामा करण्यापूर्वी लाभार्थ्यांची माहिती प्रधानमंत्री आवास योजना व्यवस्थापन माहिती प्रणाली (PMAY-MIS) पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील. PMAY-MIS पोर्टलवरून वाटप पत्र यशस्वीरीत्या जनरेट (Generate) होऊन त्याची पुष्टी (Confirmation) झाल्यानंतरच करारनाम्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल.



लॉटरी प्रक्रिया आणि क्रम

१. संगणकीय सोडत प्रक्रिया सर्वप्रथम दिव्यांग (PH- Physically Handicapped) प्रवर्गातील अर्जदारांपासून सुरू करण्यात येईल. त्यानंतर इतर प्रवर्गाकरिता प्रक्रिया चालू राहील.

२. सोडतीच्या प्रत्येक फेरीसाठी, निवड प्रक्रियेदरम्यान नोंदविलेल्या पसंतीक्रमानुसार सर्व प्रवर्गांतील अर्जदारांची निवड करण्यासाठी रॅण्डमायझर (Randomizer) प्रणालीचा वापर केला जाईल.

३. प्रणालीमध्ये अर्जदाराची नोंद झाल्यानंतर, सर्वप्रथम त्याचा/तिचा प्रवर्ग तपासला जाईल; तत्पश्चात संबंधित प्रवर्गातील सदनिकांची उपलब्धता पडताळण्यात येईल.

४. जर सदनिका उपलब्ध असतील, तर प्रणालीद्वारे अर्जदाराचा पहिला पसंतीक्रम तपासला जाईल. पहिला पसंतीक्रम उपलब्ध असल्यास, संबंधित सदनिका अर्जदारास वाटप करण्यात येईल आणि उर्वरित सर्व पसंतीक्रम आपोआप रद्द ठरतील.

५. जर पहिला पसंतीक्रम उपलब्ध नसेल, तर अर्जदाराचे उर्वरित पसंतीक्रम अनुक्रमाने तपासण्यात येईल. जर पाचही पसंतीक्रम उपलब्ध नसतील, तर अर्जदाराचा समावेश वाटप न झालेल्या यादीत (Unallocated List) केला जाईल.

६. पहिल्या फेरीअखेर सदनिका शिल्लक राहिल्यास, दुसरी व तिसरी सोडत फेरी याच कार्यपद्धतीने अनुक्रमे पार पाडली जाईल.

७. जर अर्जदार तीनही सोडत फेऱ्यांमध्ये अयशस्वी ठरला, तर "कोणतेही वाटप करा" (Allot Any) या पर्यायांतर्गत अर्जदाराने निवडलेल्या पर्यायानुसार व सदनिकांच्या उपलब्धतेनुसार सदनिकेचे वाटप करण्यात येईल.

८. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर, पात्र अर्जदारास कन्फर्मेशन पत्र (Confirmation Letter) निर्गमित करण्यात येईल व अर्जदारास ₹७५,०००/-* इतके कन्फर्मेशन शुल्क (Confirmation Amount) भरणे बंधनकारक राहील.

९. कन्फर्मेशन शुल्क प्राप्त झाल्यानंतर अर्जदारास वाटप पत्र (Allotment Letter) निर्गमित करण्यात येईल.

१०. जर अर्जदाराने स्वेच्छेने सदनिका रद्द केली अथवा कन्फर्मेशन पत्र (Confirmation Letter) निर्गमित झाल्यानंतरही विहित मुदतीत कन्फर्मेशन शुल्क (Confirmation Amount) भरली नाही, तर दिलेले इरादा पत्र (Letter of Intent - LOI) रद्द केले जाईल आणि प्रशासकीय शुल्क म्हणून ₹५,०००/- + जीएसटी (GST) वजा करून उर्वरित बुकिंग रक्कम परत केली जाईल.

११. अर्जदाराने सादर केलेली कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे कोणत्याही टप्प्यावर असत्य, चुकीची, दिशाभूल करणारी, बनावट अथवा खोटी आढळून आल्यास, किंवा कोणतीही महत्त्वाची माहिती दडपल्याचे/लपवल्याचे निदर्शनास आल्यास, सदर सदनिकेचे वाटप रद्द ठरण्यास पात्र राहील. तसेच, योजनेच्या अटी व शर्तींनुसार अर्जदाराने भरलेली रक्कम जप्त (For feiture) केली जाण्यास पात्र राहील. 'विक्री करारनामा' (Agreement for Sale) निष्पादित करतेवेळी मूळ कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी केली जाईल. अशा पडताळणीदरम्यान कोणतीही विसंगतता (Discrepancy) किंवा अपात्रता आढळून आल्यास, जोपर्यंत त्या विसंगततेचे निवारण होत नाही तोपर्यंत 'विक्री करारनामा' केला जाणार नाही अथवा योजनेच्या अटींनुसार सदनिकेचे वाटप रद्द करण्यात येईल.



भरणा करण्याबाबत नियम व अटी

देय रकमेचा भरणा करण्याबाबत सविस्तर माहिती वाटप पत्रामध्ये (Allotment Letter) नमूद करण्यात येईल.

- **हप्त्यांचा भरणा:**
  - **अ.** बुकिंग शुल्क (Booking Amount) व कन्फर्मेशन शुल्क (Confirmation Amount) वगळून, सदनिकेच्या एकूण विक्री किमतीची उर्वरित रक्कम तसेच इतर शुल्क (Miscellaneous Charges) वाटप पत्रात नमूद केलेल्या भरणा वेळापत्रकानुसार वाटपधारकास अदा करणे बंधनकारक राहील.
  - **ब.** बुकिंग शुल्क (Booking Amount) व कन्फर्मेशन शुल्क (Confirmation Amount) वगळून, सदनिकेची उर्वरित विक्री किंमत, लागू शासकीय कर, संकीर्ण, अनुषंगिक व इतर शुल्कांसह, वाटपधारकाने वाटप पत्रात (Allotment Letter) नमूद केलेल्या भरणा वेळापत्रकानुसार (Payment Schedule) अदा करणे बंधनकारक राहील. लागू होणारे मुद्रांक शुल्क (Stamp Duty) आणि नोंदणी शुल्क (Registration Fees) हे विक्री कराराच्या (Agreement for Sale) अंमलबजावणीच्या वेळी भरणे आवश्यक राहील.
  - **क.** निर्धारित कालमर्यादित हप्त्यांचा भरणा करण्यास विलंब झाल्यास, संबंधित अर्जदारास नियमानुसार लागू असणाऱ्या शुल्काचा (Delayed Payment Charges - DPC) भरणा करणे अनिवार्य आहे.
- **सदनिकेची किंमत :** वाटप केलेल्या सदनिकेची अंतिम किंमत इरादापत्रामध्ये (Letter of Intent - LOI) नमूद केली जाईल. वाटप केलेल्या सदनिकेची एकूण किंमत आणि त्यावरील Incidental Charges इरादापत्राद्वारे कळविण्यात येईल. तसेच सदनिकेबाबतचे Miscellaneous Charges आणि इतर लागू असणारे सर्व शुल्क वाटप पत्राद्वारे (Allotment Letter) कळविण्यात येतील.
- **Floor Rise Charges:** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील सदनिकांसाठी कोणतेही Floor Rise Charge लागू राहणार नाही.
- **नोंदणी (बुकिंग) रक्कम जप्त करणे बाबत:**

  अर्जदारांनी भरलेली बुकिंगची रक्कम खालील परिस्थितीत जप्त केली जाईल:

  अ. वाटप पत्र (Allotment Letter) निर्गमित झाल्यानंतर यशस्वी अर्जदाराने स्वयंइच्छेने सदनिकेचे वाटप रद्द केल्यास किंवा सदनिकेचा हक्क सोडल्यास.

  ब. अर्जदाराने असत्य/चुकीची माहिती दिल्याचे किंवा बनावट कागदपत्रे सादर केल्याचे पडताळणीदरम्यान निदर्शनास आल्यास आणि त्या आधारे अर्जदार अपात्र ठरल्यास.

  क. अर्जदाराने योजनेतील अटी व शर्तींचा भंग केल्यास.
- **वाटप रद्द करणे (Cancellation / Surrender):**

  वाटप पत्र निर्गमित झाल्यानंतर, वाटपधारकाने सदनिकेचे वाटप रद्द केले असता, भरलेली संपूर्ण बुकिंग रक्कम आणि जमा केलेल्या हप्त्यांच्या रक्कमेपैकी **१०%** रक्कम + जीएसटी (GST) (कन्फर्मेशन शुल्क वगळून) जप्त केली जाईल. अशा रद्दबातल प्रक्रियेमुळे सिडको प्राधिकरणाचे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई संबंधित वाटपधारकाकडून वसूल करण्याचा अधिकार महामंडळाकडे राहील आणि सदनिकेचे वाटप पूर्णपणे रद्द केले जाईल.
- **गहाणखत ना-हरकत प्रमाणपत्र (Mortgage NOC) शुल्क :**

  प्रधानमंत्री आवास योजने (PMAY) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गासाठी, प्रथमच गहाणखत ना-हरकत प्रमाणपत्र (Mortgage NOC) निर्गमित करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तथापि, त्यानंतरच्या प्रत्येक अतिरिक्त ना-हरकत प्रमाणपत्रासाठी प्रति अर्ज **१००/-** (अक्षरी रुपये शंभर मात्र) + जीएसटी (GST) इतके शुल्क आकारले जाईल.

  माहितीतील बदल / दुरुस्ती (Demographic Changes) शुल्क:

  वैयक्तिक माहितीतील बदलांसाठी (जसे की नाव दुरुस्ती करणे, सह-अर्जदाराचे नाव समाविष्ट / कमी करणे / बदलणे) अर्जदाराकडून **₹५,०००/-** (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) + (GST) इतके शुल्क आकारले जाईल.



परिशिष्ट I

'माझे पसंतीचे सिडकोचे घर' योजनेसाठी नोंदणी करताना अर्जदाराकडून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी	
सर्व अर्जदारांसाठी अनिवार्य कागदपत्रे	• अर्जदाराचे आधार कार्ड • अर्जदाराचे पॅन कार्ड • बारकोडयुक्त अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate with Barcode) - महाराष्ट्राच्या कोणत्याही भागात किमान **१५** वर्षे वास्तव्य असावे (माजी सैनिकांना यातून सूट) • **२** पासपोर्ट साईज फोटो **पुढीलपैकी कोणतेही एक कागदपत्र असणे आवश्यक आहे:** १. कुटुंबातील सर्व सदस्यांचे आर्थिक वर्ष **२०२५-२६** चे सविस्तर आयकर परतावा विवरणपत्र (ITR) (FY - **२०२५-२६,** AY - **२०२६-२७**) २. सक्षम महसूल अधिकाऱ्याने (तहसीलदार) निर्गमित केलेले आर्थिक वर्ष **२०२५-२६** चे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र ३. नियोक्त्याकडून (Employer) प्राप्त झालेला आर्थिक वर्ष **२०२५-२६** चा अधिकृत उत्पन्नाचा दाखला (लेटरहेडवर सही वर शिक्क्यासह) ४. सह-अर्जदार कमावता नसल्यास तसे घोषणापत्र जमा करणे आवश्यक आहे (कृपया फॉर्म G पहावा) सह-अर्जदाराचे आधार कार्ड (लागू असल्यास) सह-अर्जदाराचे पॅन कार्ड (लागू असल्यास) **टीप:** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (EWS) अर्जदारांसाठी कौटुंबिक उत्पन्नाचा पुरावा सादर करणे अनिवार्य आहे. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न **₹६,००,०००/-** (रुपये सहा लाख) पर्यंत असावे. अर्जदार व त्याचा/तिची पती/पत्नी दोघेही कमावते असल्यास, दोघांच्या उत्पन्नाचा पुरावा (आयकर परतावा / वेतन प्रमाणपत्र / लागू असलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला) जोडणे अनिवार्य राहील.

वरील प्रवर्गाव्यतिरिक्त अतिरिक्त कागदपत्रे	
आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) PMAY(U)	- फॉर्म-ए (Form-A) (प्रतिज्ञापत्र / Affidavit): अर्जदार, त्यांचा/त्यांची पती/पत्नी आणि अविवाहित मुले यांच्या नावे संपूर्ण भारतात कुठेही पक्के घर (सदनिका/भूखंड) नाही, याबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र. - प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) (PMAY-U) प्रमाणपत्र: (जर अर्जदाराला शासकीय अनुदान घ्यायचे असेल तर). प्रधानमंत्री आवास योजना २.० (PMAY 2.0) चे प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही. - अर्जदाराने केंद्र सरकारच्या (https://pmaymis.gov.in) या संकेतस्थळावर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नोंदणी केलेली असावी.

अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ भटक्या जमाती/विमुक्त जाती (SC/ST/NT/DT):	**उप-गट अ (A) - वैधानिक प्रवर्ग**
	- सक्षम प्राधिकरणाद्वारे निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) - सक्षम प्राधिकरणाद्वारे निर्गमित केलेले जात पडताळणी प्रमाणपत्र (लागू असल्यास)

दिव्यांग (शारीरिक विकलांग) प्रवर्ग
दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, **२०१६**' नुसार सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र (Disability Certificate) आणि युनिक डिसॅबिलिटी आयडी (UDID) कार्ड, ज्याद्वारे अर्जदाराचा दिव्यांग (PH) प्रवर्गातील दावा सिद्ध होतो. (पात्रतेसाठी अंधत्व, अल्पदृष्टी, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधिरत्व, अस्थिव्यंग, मतिमंदत्व, स्वमग्नता (Autism), मानसिक आजार, विशिष्ट शिकण्याची अक्षमता (Specific Learning Disability) आणि बौद्धिक अक्षमता यांसारख्या शारीरिक/मानसिक अक्षमतेचे प्रमाण किमान ४०% असणे अनिवार्य राहील.)

उप-गट ब (B) – आरक्षित प्रवर्ग (बिगर संवैधानिक प्रवर्ग)	
सेवेत कार्यरत शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतील कर्मचारी(किमान **५** वर्षे सेवा पूर्ण असणे आवश्यक)	शासकीय आस्थापनेच्या अधिकृत लेटरहेडवर विहित नमून्यातील फॉर्म-सी (Form-C) अथवा अधिकृत कर्मचारी ओळखपत्र
महाराष्ट्रातील पत्रकार	विहित नमुन्यातील फॉर्म-डी (Form-D) (पत्रकारांचे प्रतिज्ञापत्र) आणि सिडकोच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी (PRO) निर्गमित केलेले अधिकृत प्रमाणपत्र
धार्मिक अल्पसंख्याक	धार्मिक अल्पसंख्याक प्रवर्गातील असल्याबाबत फॉर्म-ई (Form-E)
प्रकल्पग्रस्त व्यक्ती (महाराष्ट्र)	प्रकल्पग्रस्त कुटुंबाच्या वंशावळीचे प्रतिज्ञापत्र, निवाडा प्रत (Award Copy), **७/१२** उतारा अथवा संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून/विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र
माजी सैनिक आणि निमलष्करी दल	सेवेचे ओळखपत्र / सेवा निवृत्ती कागदपत्रे / जिल्हा सैनिक कल्याण मंडळ अथवा सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र
माथाडी कामगार	सक्षम माथाडी कामगार मंडळाने निर्गमित केलेले प्रमाणपत्र (केवळ मुंबई महानगर क्षेत्रातील (MMR) कामासाठी लागू)

अविवाहित किंवा विवाहित व्यतिरिक्त इतर स्थिती असल्यास	
वैवाहिक स्थिती	आवश्यक कागदपत्र
विधवा / विधुर	पती/पत्नीचे मृत्यू प्रमाणपत्र (Death Certificate).
घटस्फोटित	सक्षम न्यायालयाकडून निर्गमित केलेला घटस्फोटाचा तिम आदेश / हुकूमनामा (Decree of Divorce)

टीप: सर्व अर्ज डिजिटल पद्धतीने भरणे आणि घोषणेच्या पुष्टीकरणासाठी आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. सर्व दस्तऐवज स्वाक्षरीत (Self-attested) स्कॅन केलेल्या प्रतींच्या स्वरूपात JPG/ PNG/ PDF फॉरमॅटमध्ये असणे आवश्यक आहे – फाईलचा आकार 2 MB पेक्षा जास्त नसावा. अधिवास प्रमाणपत्रासाठी (Domicile Certificate) बारकोड असलेला दस्तऐवज अनिवार्य आहे

अर्ज/ शपथपत्रे / घोषणापत्रे

फॉर्म ए (A): आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील अर्जदारांसाठी प्रतिज्ञापत्र

मी अर्जदार, श्री/श्रीमती _____, वय _____ वर्षे,

सध्या_____येथे वास्तव्यास

असून, माझा आयकर आकारणीस पात्र कायम खाते क्रमांक (PAN)

_____आहे.

मी या प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करतो की, मी 'प्रधानमंत्री आवास योजना' (PMAY) अंतर्गत सदनिका वाटपासाठी अर्ज करत आहे. माझ्या कुटुंबातील सदस्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

क्र.	सदस्यांची नावे	अर्जदाराशी नाते	लिंग	वय	आधार क्र. आणि पॅन क्रमांक	ओळखपत्र (इतर)	इतर ओळखपत्र क्र.

मी याद्वारे पुढे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, मी अथवा वर नमूद केलेले माझे कुटुंबीय यांच्या नावे संपूर्ण भारतात कुठेही कोणतेही पक्के घर (सदनिका/भूखंड) नाही. तसेच आर्थिक वर्ष २०२५–२६ साठी माझे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ₹६,००,०००/- (रुपये सहा लाख) पर्यंत आहे .

मी पुढे नमूद करतो की, मी सर्वसाधारण / अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / भटक्या जमाती / विमुक्त जाती / अंध किंवा शारीरिकदृष्ट्या दिव्यांग प्रवर्गामध्ये मोडतो/मोडते. (योग्य त्या प्रवर्गाचा उल्लेख करावा.)

मी पुढे प्रमाणित करतो की, मी महाराष्ट्र राज्यात किमान १५ वर्षे सलग वास्तव्य केलेले आहे.

मी पुढे प्रमाणित करतो की, वरील सर्व माहिती माझ्या ज्ञान व समजुतीनुसार संपूर्णपणे सत्य आणि अचूक आहे. वर नमूद केलेली कोणतीही माहिती असत्य, चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास, त्याबाबत होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी पूर्णपणे जबाबदार राहीन आणि त्याबाबत सिडको प्राधिकरणावर कोणतेही दायित्व असणार नाही.

मी पुढे नमूद करतो की, जर उपरोक्त माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास, सिडको प्राधिकरणाने केलेले सदनिकेचे वाटप पूर्णपणे रद्द करण्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

मी घोषित करतो की, मी सदर योजनेच्या सर्व अटी व शर्ती पूर्णपणे समजून घेतल्या असून या संदर्भातील सिडको प्राधिकरणाच्या सर्व प्रचलित व भविष्यात लागू होणाऱ्या नियमांना/शर्तींना बांधील राहीन.

दिलेली कोणतीही माहिती किंवा दस्तऐवज खोटा, बनावट अथवा दिशाभूल करणारा असल्याचे आढळल्यास, त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी वैयक्तिकरीत्या जबाबदार राहीन; तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), 2023 मधील लागू असलेल्या तरतुदींनुसार, ज्यामध्ये कलम २२७, २२९, २३६ आणि २३७ (जसे लागू असेल त्यानुसार) चा समावेश आहे, शिक्षेस पात्र राहीन.

दिनांक: **अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा**

ठिकाण:

फॉर्म सी (C): महाराष्ट्र राज्य सरकारी अधिकारी / कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र
संबंधित विभागाच्या अधिकृत लेटरहेडवर

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती _____,
राहणार/पत्ता _____
हे _____ या विभागाचे कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्यरत असून त्यांची नियुक्ती दि. _____ रोजी झाली आहे. सध्या ते/त्या _____ विभागात _____ या पदावर कार्यरत आहेत. त्यांचा पॅन क्र. _____ आहे.

दिनांक:

ठिकाण:

अधिकाऱ्याचे नाव:
पद:
विभाग:

विभागाचा शिक्का:

फॉर्म डी (D) : महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांसाठी घोषणापत्र

मी अर्जदार, श्री./श्रीमती _____, वय _____ वर्षे,

सध्या _____ येथे

वास्तव्यास असून,

माझा पॅन क्रमांक (PAN) / आधार क्रमांक _____ आहे. तसेच मी

आयकरदाता आहे.

मी परिशिष्ट–II अनुसार पत्रकार श्रेणीमध्ये समाविष्ट आहे, आणि मी

_____ (वृत्तपत्र / साप्ताहिक / मासिक /

नियतकालिकाचे नाव) येथे _____ (पदनाम)

या पदावर कार्यरत आहे.

मी प्रमाणित करतो/करते की, मी पत्रकार प्रवर्गामध्ये मोडतो/मोडते. मी पत्रकार श्रेणीमध्ये येतो/येते आणि वृत्तपत्र संस्थेच्या प्रशासकीय विभाग, व्यवस्थापन विभाग, पर्यवेक्षकीय भूमिका किंवा इतर कोणत्याही व्यवस्थापन-संबंधित संवर्गाचा (कॅडरचा) भाग नाही.

मी याद्वारे पुढे असे घोषित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी किंवा चुकीची असल्याचे आढळल्यास, मला सदनिकेचे (घराचे) वाटप रद्द करण्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

दिलेली कोणतीही माहिती किंवा दस्तऐवज खोटा, बनावट अथवा दिशाभूल करणारा असल्याचे आढळल्यास, त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी वैयक्तिकरीत्या पूर्णतः जबाबदार राहीन; तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), 2023 मधील लागू असलेल्या तरतुदींनुसार, ज्यामध्ये कलम २२७, २२९, २३६ आणि २३७ (जसे लागू असेल त्यानुसार) चा समावेश आहे, शिक्षेस पात्र राहीन.

दिनांक: **अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा**

परिशिष्ट – II

पत्रकारांना 'पत्रकार प्रमाणपत्र' देण्यासाठी निकष/ नियमावली

1) वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिक /नियतकालिके या माध्यमांमध्ये संपादकीय विभागात तसेच मुक्त पत्रकार म्हणून काम करण्याचा किमान सलग तीन वर्षांचा अनुभव. (वरील अटींची पूर्तता करणारे पत्रकार हे स्वतंत्र व्यवसायी किंवा करार पध्दतीने नेमणूक झालेले अथवा श्रमिक पत्रकार असू शकतील.)

2) स्वतःच्या नावे किंवापतीच्या / पत्नीच्या नावे मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रात किंवा संबंधित सोडतीतील सदनिका / भूखंड ज्या महापालिकेच्या कार्यक्षेत्रात येते त्या कार्यक्षेत्रात सदनिका अथवा भूखंड नाही, तसेच यापूर्वी म्हाडा / सिडको / मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार कोट्यातून (१०% / ५%) सदनिका घेतलेली नाही असे पत्रकार.

3) वृत्त वाहिन्यांच्या संपादकीय विभागात कार्यरत व्यक्ती ज्यांचा संबंध पत्रकारितेशी येतो अशा खालील पदांवर संपादकीय विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचा समावेश 'पत्रकार' म्हणून करण्यात येईल- 1 वरिष्ठ कार्यकारी संपादक (Senior Executive Editor), 2 कार्यकारी संपादक (Executive Editor), 3 सहाय्यक संपादक (Assistant Editor), 4. वृत्त संपादक (News Editor), 5. वरिष्ठ निर्माता (Senior Producer), 6. निर्माता (Producer), 7. सहयोगी निर्माता (Associate Producer), 8. सहाय्यक निर्माता (Assistant Producer), 9. आशय निर्माता (Content Producer), 10. प्रतिनिधी (Correspondent), 11. बातमीदार / वार्ताहर (Reporter), 12. कॅमेरामन (व्हिडिओ जर्नालिस्ट), 13 वरिष्ठ संपादक (Senior Editor), 14 वृत्तनिवेदक (Anchor) 15. विशेष प्रतिनिधी Correspondent), 16. वरिष्ठ छायाचित्रकार (Senior Cameraman), 17. सहयोगी छायाचित्रकार (Associate Cameraman), 18. उपनिर्माता (Deputy Producer), 19. प्रमुख नियोजन आणि विशेष प्रकल्प (Head Planning & Special Project) 20. मुख्य सूत्रसंचालक (Chief Anchor) 21. प्रमुख बातम्या आणि कार्यक्रम निर्मिती (Head News & Programme Production) 22. सहयोगी कार्यकारी निर्माता (Associate Executive Producer) 23. असाइनमेंट प्रमुख (Assignment Head) 24. सहयोगी वरिष्ठ निर्माता (Associate Senior Producer) 25. कनिष्ठ छायाचित्रकार (Junior Cameraman) 26. ब्युरो प्रमुख आरसी (Bureau Chief RC) 27. वृत्त संकलन प्रमुख (Head News Gathering) 28. Copywriter (जाहिरात लेखक) 29. स्ट्रिंगर 30. वृत्त संकलन संपादक (Input Editor) 31. वरिष्ठ सहाय्यक निर्माता (Senior Executive Producer) 32. वरिष्ठ बातमीदार (Senior Reporter) 33. मसुदा तपासणीकार (Copy Editor) 34. वृत्त प्रसारण संपादक (Output Editor) 35. उप कार्यकारी निर्माता (Deputy Executive Producer) 36. वरिष्ठ सहाय्यक निर्माता (Senior Assistant Producer) 37. प्रमुख प्रतिनिधी (Principal Correspondent) 38. वरिष्ठ मजकूर संपादक (Senior Copy Editor) 39. वरिष्ठ प्रतिनिधि (Senior Correspondent) 40. वरिष्ठ उपसंपादक (Senior Sub Editor) 41. चॅनेल प्रमुख (Channel Head) 42. बुलेटिन निर्माता/अँकर (Bulletin Producer cum Anchor) 43. बातमीपत्र निर्माता (Bulletin Producer) 44. सहकारी बातमीपत्र निर्माता (Associate Bulletin Producer) 45. सहाय्यक छायाचित्रकार

तथापि खालील व्यक्तीचा पत्रकार' या गटामध्ये समावेश होणार नाहीः-

वृत्तवाहिन्यांमध्ये पत्रकारिता, वृत्त संकलन, वृत्त संपादन, वार्तांकिन क्षेत्र वगळता व्हिडिओ एडिटर, मेकअप आर्टीस्ट, हेअर स्टायलिस्ट, लायब्ररीयन, सिनीअर लायब्ररीयन, प्लॅनर ऑन स्पेशल प्रोजेक्ट, ग्राफिक डिझायनर, आर्टिस्ट, तांत्रिक पदे.

४) अर्जदाराची पात्रता निश्चित करतेवेळी उत्पन्नाचा स्त्रोत याबाबत स्पष्टता हवी, याकरीता सदनिकेकरिता पत्रकार' संवर्गातून अर्ज करणा-या वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिके / नियतकालिके या माध्यमांतील पत्रकार अर्जदाराचे 'पत्रकार' म्हणून काम करताना पूर्णवेळ उपजिविकेचे साधन हे पत्रकारिता असणे बंधनकारक असेल. दूरचित्रवाणी / वृत्तवाहिन्या केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेल्या आणि २४ तास वृत्त प्रसारण करणाऱ्या असाव्यात.

५) तसेच यापूर्वी म्हाडाने पत्रकार प्रवर्गमध्ये कुणाचा समावेश होतो याबाबत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम, १९८१ मधील नियम (जी) मध्ये नमूद पूर्वीच्या खालील नमूद बाबींचाही (अर्जदार व्यक्ती वर्तमानपत्राच्या आस्थापनेवरील अथवा वर्तमानपत्राशी संबंधित असावी. संपादक, लिडर रायटर, वृत्त संपादक, वृत्त लेखक, वार्ताहर, व्यंगचित्रकार, वृत्त छायाचित्रकार, मुद्रीत तपासणीस यांचा तसेच जी व्यक्ती नियमित प्रख्यात साप्ताहिक, मासिक वा नियतकालिकांमधील मुक्त पत्रकार) या गटामध्ये समावेश होतो.
तथापि खालील व्यक्तींचा पत्रकार या गटामध्ये समावेश होत नाहीः-

अ) वृत्तपत्र व्यवस्थापन व प्रशासन विभागातील कर्मचारी,

ब) पर्यवेक्षक म्हणून काम करणारे कर्मचारी ज्यांची सेवा वृत्तपत्र कार्यालयाशी संबंधित अथवा ज्या कारणासाठी व्यवस्थापन स्वरूपाचे काम करणारे कर्मचारी, वृत्तपत्रातील पानांची मांडणी, रचना करणारे पेजिनेटर, डीटीपी ऑपरेटर, लेखा विभाग (Account Department) व मनुष्यबळ विकास विभाग / कार्मिक विभाग (Human Resource Department) मुद्रण विभाग (Printing Department) यात कार्यरत कर्मचारी.

६) वृत्तवाहिनी / वृत्तपत्रे / साप्ताहिक / मासिके / नियतकालिक या माध्यमांच्या संबंधित संपादकांनी संबंधित विजेता अर्जदार हा त्या संस्थेच्या संपादकीय विभागात कार्यरत असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेले व अनुभवाचे पत्र संबंधित संस्थेच्या मूळ लेटरहेडवर आपल्या स्वाक्षरीसह देणे आवश्यक आहे.

७) वृत्तपत्रे / साप्ताहिके / मासिके / नियतकालिके ही माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडे नोंदणीकृतच असणे आवश्यक आहे. वृत्तवाहिनी केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण विभागात नोंदणी झालेली व २४ तास वृत्त प्रसारण करणारी असावी.

८) वृत्तपत्रे / साप्ताहिके / मासिके / नियतकालिके यामध्ये काम करणाऱ्या बातमीदार / वार्ताहर / प्रतिनिधीने सोडतीत विजेता ठरल्यानंतर गेल्या ६ महिन्यातील श्रेयनामावलीची किमान ५ कात्रणे (By line clippings) मूळ प्रत सादर करणे आवश्यक आहे.

फॉर्म ई (E) : धार्मिक अल्पसंख्याक प्रवर्गातील अर्जदारांसाठी घोषणापत्र

मी अर्जदार, श्री. / श्रीमती _____, वय _____ वर्षे,

सध्या_____येथे राहणारा/राहणारी असून

पॅन क्रमांक (PAN): _____ च्या अंतर्गत आयकर आकारणीस पात्र आहे.

या प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करतो/करते की, मी सिडको गृहप्रकल्पांतर्गत 'धार्मिक अल्पसंख्याक' प्रवर्गातून सदनिका वाटपासाठी अर्ज केला आहे. मी मुस्लिम / ख्रिश्चन / शीख / बौद्ध / पारशी / जैन या केंद्र सरकारच्या 'राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग अधिनियम, **१९९२** (राजपत्र भाग **२**(क))' अंतर्गत अधिसूचित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक समुदायाचा/समुदायाची आहे.

मी पुढे नमूद करतो/करते की, वरील माहिती माझ्या ज्ञान व समजुतीनुसार सत्य आणि अचूक आहे. भविष्यात उपरोक्त माहिती खोटी, चुकीची अथवा असत्य आढळल्यास, सिडको प्राधिकरणाने केलेले सदनिकेचे वाटप रद्द करण्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही आणि त्याबाबत मी सिडकोवर कोणतेही दायित्व ठेवणार नाही.

दिलेली कोणतीही माहिती किंवा दस्तऐवज खोटा, बनावट अथवा दिशाभूल करणारा असल्याचे आढळल्यास, त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी वैयक्तिकरीत्या पूर्णतः जबाबदार राहीन; तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील लागू असलेल्या तरतुदींनुसार, ज्यामध्ये कलम २२७, २२९, २३६ आणि २३७ (जसे लागू असेल त्यानुसार) चा समावेश आहे, शिक्षेस पात्र राहीन.

दिनांक **अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा**

सोबत: शाळा सोडल्याचा दाखला

फॉर्म एफ (F) : अविवाहित/एकल अर्जदारांसाठी घोषणापत्र

मी, अर्जदार श्री/कुमारी _____,वय_____वर्षे, राहणार/पत्ता_____याद्वारे प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो/करते की मी आज दि. _____ रोजी अविवाहित आहे.

मी 'प्रधानमंत्री आवास योजना' (PMAY) अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातून सिडकोच्या गृहप्रकल्पातील सदनिका वाटपासाठी अर्ज केला आहे. अर्ज क्र. _____

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, माझ्याकडून दिलेली संपूर्ण माहिती पूर्णपणे सत्य आणि अचूक आहे. मी दिलेली माहिती असत्य, चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास, त्यातून उद्‌भवणाऱ्या भविष्यातील कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी पूर्णतः जबाबदार राहीन.
मी याद्वारे पुढे असे घोषित करतो/करते की, वरील माहिती मी कोणत्याही दबावाशिवाय, जबरदस्तीशिवाय किंवा प्रलोभनाशिवाय स्वेच्छेने सादर केली आहे आणि मी या माहितीच्या सत्यतेची व अचूकतेची गांभीर्याने पुष्टी करतो/करते. मला याची पूर्ण जाणीव आहे की, या शपथपत्रात (Affidavit) दिलेली कोणतीही माहिती खोटी किंवा बनावट असल्याचे आढळल्यास, मी भारतीय न्याय संहिता, 2023 मधील लागू असलेल्या तरतुदींनुसार, ज्यामध्ये कलम **२२७, २२९, २३६ आणि २३७** (जसे लागू असेल त्यानुसार) चा समावेश आहे, शिक्षेस पात्र राहीन.

सदर प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकूर मला माझ्या मातृभाषेत/समजणाऱ्या भाषेत वाचून दाखविला व समजावून सांगितला असून, तो पूर्णपणे सत्य व अचूक असल्याचे मी प्रमाणित करतो/करते.

दिनांक: **अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा**

फॉर्म जी - (अ) (G - (a)) स्व-घोषणापत्र

(नोकरी करत नसलेल्या / कोणताही व्यवसाय न करणाऱ्या / कार्यरत नसलेल्या अर्जदारांसाठी)

मी, श्री/श्रीमती _____,वय_____वर्षे,

राहणार/पत्ता _____, जाहीर करतो/करते की,

मी सध्या कोणत्याही ठिकाणी कार्यरत नसून कोणताही व्यवसाय करत नाही. सबब, आर्थिक वर्ष **२०२५-२०२६** करिता मला कोणतेही उत्पन्न प्राप्त नाही.

मी पुढे जाहीर करतो/करते की, माझ्या कुटुंबातील सदस्य व त्यांचे आर्थिक वर्ष **२०२५-२६** करिता मिळणारे उत्पन्न पुढीलप्रमाणे आहे:

अ. क्र.	नाव	नाते	नोकरी/व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न
१.			
२.			
३.			
४.			
५.			

वर दिलेली माहिती पूर्णपणे सत्य आणि अचूक आहे.
मी पुढे असेही घोषित करतो/करते की, मी दिलेली माहिती असत्य, चुकीची किंवा खोटी आढळून आल्यास, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या., महाराष्ट्र (सिडको) प्राधिकरणाने केलेले सदर सदनिकेचे वाटप रद्द ठरण्यास मी पात्र राहील. अशा असत्य माहितीमुळे माझ्यावर होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर अथवा फौजदारी कारवाईस मी स्वतः पूर्णतः जबाबदार राहीन आणि त्याबाबत सिडको प्राधिकरणावर कोणतेही दायित्व असणार नाही. चुकीच्या/बनावट माहितीच्या आधारे मी कोणत्याही हक्काची वा दाव्याची मागणी करणार नाही, तसेच अपात्रता अथवा वाटप/लाभ रद्द झाल्याबाबत कोणतीही हरकत घेणार नाही.

दिलेली माहिती खोटी किंवा असत्य आढळल्यास, त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी मी स्वतः पूर्णतः जबाबदार राहीन. भारतीय दंड संहिता (IPC) कलम **१९९, २०० व १९३(२)** अथवा लागू असल्यास भारतीय न्याय संहिता (BNS), **२०२३** मधील संबंधित तरतुदींनुसार (कलम **२२७, २३४ व २३५**) मी शिक्षेस/दंडास पात्र राहीन, याची मला पूर्ण जाणीव आहे.

सदर विधान पूर्णतः सत्य असून आज दिनांक: ____ / ____ / २०____ रोजी नवी मुंबई येथे सत्यापित (Verified) केले आहे.

दिनांक: **स्वाक्षरी:**

अर्जदाराचे नाव:

फॉर्म जी - (ब) (G - (b)) स्व-घोषणापत्र

(नोकरीत नसलेल्या जोडीदार/अर्जदारासाठी)

मी अर्जदार, श्री/श्रीमती _____, वय_____वर्षे, राहणार_____ व्यवसाय_____, याद्वारे प्रतिज्ञापूर्वक जाहीर व घोषित करतो/करते की, माझे/माझी पती / पत्नी श्री. / श्रीमती _____, वय _____ वर्षे, हे/ह्या सध्या कोणत्याही ठिकाणी कार्यरत नसून कोणताही व्यवसाय करत नाहीत. त्यामुळे, त्यांना आर्थिक वर्ष **२०२५–२०२६** साठी उत्पन्नाचा कोणताही स्रोत उपलब्ध नाही.

मी पुढे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, खालीलप्रमाणे नमूद केलेले सदस्य व त्यांचे आर्थिक वर्ष **२०२५-२६** करीत वार्षिक उत्पन्न पुढील प्रमाणे आहे:

अ. क्र.	नाव	नाते	नोकरी/व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न
१.			
२.			
३.			
४.			
५.			

वर दिलेली माहिती पूर्णपिणे सत्य आणि अचूक आहे.

मी पुढे असेही घोषित करतो/करते की, मी दिलेली माहिती असत्य, चुकीची किंवा खोटी आढळून आल्यास, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या., महाराष्ट्र (सिडको) प्राधिकरणाने केलेले सदर सदनिकेचे वाटप रद्द ठरण्यास मी पात्र राहील. अशा असत्य माहितीमुळे माझ्यावर होणाऱ्या कोणत्याही कायदेशीर अथवा फौजदारी कारवाईस मी स्वतः पूर्णतः जबाबदार राहीन आणि त्याबाबत सिडको प्राधिकरणावर कोणतेही दायित्व असणार नाही. चुकीच्या/बनावट माहितीच्या आधारे मी कोणत्याही हक्काची वा दाव्याची मागणी करणार नाही, तसेच अपात्रता अथवा वाटप/लाभ रद्द झाल्याबाबत कोणतीही हरकत घेणार नाही.

दिलेली कोणतीही माहिती किंवा दस्तऐवज खोटा, बनावट अथवा दिशाभूल करणारा असल्याचे आढळल्यास, त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कायदेशीर कारवाईस मी वैयक्तिकरीत्या पूर्णतः जबाबदार राहीन; तसेच भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ मधील लागू असलेल्या तरतुदींनुसार, ज्यामध्ये कलम २२७, २२९, २३६ आणि २३७ (जसे लागू असेल त्यानुसार) चा समावेश आहे, शिक्षेस पात्र राहीन.

सदर विधान पूर्णतः सत्य असून आज दिनांक: ____ / ____ / २०____ रोजी नवी मुंबई येथे सत्यापित (Verified) केले आहे.

दिनांक: **स्वाक्षरी:**

अर्जदाराचे नाव:

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

*आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी PMAY(U) अंतर्गत
₹ २.५ लाख रुपयांचे अनुदान सप्टेंबर २०२६ पर्यंत उपलब्ध
(*PMAY २.० प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही)

सिडको
शहरांचे शिल्पकार
CIDCO HOMES



कलात्मक प्रतिमा

अधिक माहितीसाठी https://cidcohomes.com या संकेतस्थळाला भेट द्या.

प्रोजेक्टचे रेरा क्रमांक https://maharera.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर पाहायला मिळतील. | फॉलो करा- @Cidco Ltd | @cidco_ltd | @Cidco_Ltd | CIDCO Ltd.

सर्व आघाडीच्या बँकांकडून गृहकर्जाची उपलब्धता | हेल्पलाईन क्रमांक: +९१ ९९३०८ ७०००० | +९१ ८०६२३ ६८०००

*PMAY अनुदान हे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वे, पात्रता निकष तसेच योजनेच्या वैधतेसंदर्भातील अधिकृत अधिसूचनांच्या अधीन राहून लागू राहील.

अस्वीकरण: सुविधा, वैशिष्ट्ये, तसेच आसपासच्या पायाभूत सुविधा सूचक आणि प्रातिनिधिक हेतूसाठी आहेत; त्यामधील प्रतिमा वास्तवाशी वेगळी असू शकतात. आतील, पटिसर किंवा स्थानांच्या छायाचित्रांमध्ये, अन्यथा उल्लेख न करता, डिजिटल पद्धतीने सुधारणा केली जाते. सर्व छायाचित्रे प्रत्यक्ष साइटवर शूट केलेली नसू शकतात. प्रतिमांमध्ये दाखवलेली उत्पादने, वैशिष्ट्ये, लाइट फिटिंग्ज, चित्रे इत्यादी केवळ संदर्भासाठी आहेत. प्रतिमांमध्ये दाखविलेले रंग, भिंती, फरशा आणि छटा केवळ प्रातिनिधिक आहेत आणि प्रत्यक्ष बांधकामानुसार त्यात बदल होऊ शकतात.